# राज्य राखीव पोलीस बल, गट क्र.12, हिंगोली.

## सशस्त्र पोलीस शिपाई भरती सन-2022-23

## -: लेखी परिक्षेसाठी पात्र उमेदवारांना सुचना :-

- समादेशक, राज्य राखीव पोलीस बल गट क्र.१२, हिंगोली या गटाच्या आस्थापनेवर रिक्त असलेल्या २२२ सशस्त्र पोलीस शिपाई पदासाठी दिनांक १९.०६.२०२४ ते २३.०७.२०२४ या कालावधीत मैदानी चाचणी घेण्यात आली आहे. तसेच १:१० या प्रमाणात लेखी परिक्षेकरीता पात्र ठरलेल्या उमेदवारांची अंतीम निवड यादी दिनांक ३०.०७.२०२४ रोजी उमेदवारांच्या माहिती करीता www.mahapolice.gov.in व www.maharashtrasrpf.gov.in या संकेतस्थळावर तसेच या घटकाचे मुख्य प्रवेशव्दाराच्या व ATM प्रवेशव्दाराच्या सुचना फलकावर प्रसिध्द करण्यात आली आहे.
- लेखी परिक्षे करीता पात्र ठरलेल्या उमेदवारांची लेखी परिक्षा दिनांक ११.०८.२०२४ रोजीचे ११:०० वाजता घेण्यात येणार असुन त्याबाबतचे प्रवेशपत्र महा-आयटी कंपनी कडुन वाटप करण्यात आले आहे. लेखी परिक्षे करीता पात्र उमेदवारांनी सकाळी ०८:०० वाजता दिलेल्या परिक्षा केंद्रावर वेळेत उपस्थित राहावे ०८:०० नंतर येणाऱ्या उमेदवारांना परिक्षा केंद्रावर प्रवेश दिला जाणार नाही याबाबत उमेदवारांनी नोंद घ्यावी.
- लेखी परिक्षे करीता येणाऱ्या उमेदवारांनी **महा-आयटी यांनी दिलेले प्रवेशपत्र तसेच मैदानी चाचणी दरम्यान उमेदवारांना देण्यात आलेले ओळखपत्र** सोबत घेवुन येणे अन्यथा उमेदवारांना **परिक्षा केंद्रावर प्रवेश दिल्या जाणार नाही.**
- उमेदवारांनी सोबत **चार पासपोर्ट फोटो तसेच स्वत:च फोटो असलेले ओळखपत्र (उदा. पॅनकार्ड, अधारकार्ड, मतदान कार्ड,वाहन चालक परवाना इत्यादी ) सोबत घेवुन येणे.**
- उमेदवारास परिक्षा वर्गावर येतांना मोबाईल, घडयाळ, ब्लुटुथ, डिजीटल डायरी, मायक्रोफोन, कॅल्क्युलेटर, नोटपॅड, नोटबुक, बटन कॅमेरा, कॅमेरा पेन या सारखी कोणतीही इलेक्ट्रॉनिक उपकरणे, प्रतिबंधक वस्तु स्वत:जवळ घेवुन येवु नये. असे उपकरण/वस्तु आढळुण आल्यास उमेदवारास भरती प्रक्रीयेमधुन बाद ठरवुन त्यांची उमेदवारी रद्द करण्यात येईल व गुन्हा दाखल करण्याची कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल.
- उमेदवारांनी परिक्षा केंद्रामध्ये एकवेळ प्रवेश केल्यानंतर परिक्षा संपेपर्यंत कुठल्याही परिस्थितीमध्ये परिक्षा केंद्राच्या बाहेर जाता येणार नाही. याबाबत उमेदवारांनी नोंद घ्यावी.
- परिक्षा केंद्राच्या आवारात मित्र, नातेवाईक, पालक व अन्य अनाधिकृत व्यक्तीस प्रवेश देण्यात येणार नाही.
- परिक्षा केंद्रावर व परिक्षा केंद्राच्या परिसरात कुठलाही अनुचीत प्रकार घडणार नाही या करीता परिक्षा केंद्रावर खोलीनिहाय/सेक्टर निहाय व्हीडीओ रेकॉर्डीग व CCTV बसविण्यात येणार आहेत. ओळख पटणे करीता प्रत्येक उमेदवारांची बायोमॅट्रीक्स घेण्यात येणार असुन डमी उमेदवार आढळुन आल्यास तसेच परिक्षा दरम्यान गैरवर्तन आढळुन आल्यास उमेदवारास लेखी परिक्षेकरीता अपात्र ठरविण्यात येईल व त्यांचे विरूध्द योग्य ती कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल याबाबत उमेदवारांनी नोंद घ्यावी.
- लेखी परिक्षे करीता आलेल्या उमेदवारांना या कार्यालयाकडुन पेन व पॅड देण्यात येणार आहे. त्यामुळे उमेदवारांनी सोबत येतांना इतर अनावश्यक साहित्य आणु नये, आणल्यास सदरचे साहित्य परिक्षा केंद्राच्या बाहेर ठेवण्यात येतील व त्याची सर्वस्व जबाबदारी संबधीत उमेदवारांची राहील.

- एखादा उमेदवार लेखी परिक्षेकरीता गैरहजर राहील्यास, त्याला पुन्हा लेखी परिक्षेकरीता अतिरीक्त संधी देण्यात येणार नाही व भरती प्रक्रीयेतुन अपात्र ठरविण्यात येईल.
- लेखी परिक्षे दरम्यान उमेदवार आपसात बोलतांना आढळुण आल्यास सदरचा प्रकार नकल करीत असल्याचे समजुन आपसात बोलणाऱ्या उमेदवारांना त्याक्षणीच पुढील पुर्ण प्रक्रीये करीता अपात्र ठरविण्यात येईल याबाबत उमेदवारांनी नोंद घ्यावी.

**दिनांक** :- **०७.०८.२०२४**
**ठिकाण** :- **हिंगोली**.

**( पौर्णिमा गायकवाड ) भा.पो.से.**
समादेशक
राज्य राखीव पोलीस बल, गट क्र.१२, हिंगोली